तरुणभारत ८ सप्टे ०८

# कमला कॉलेजमध्ये शिक्षक दिन साजरा

कोल्हापूर ■

ताराराणी विद्यापीठाच्या कमला कॉलेजमध्ये विद्यार्थीनी कल्याण मंडळाच्यावतीने शिक्षक दिन साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी ताराराणी विद्यापीठाचे सचिव प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील होते.विद्यार्थीनीच्यावतीने रेखा चिलमूर, प्रियांका वरपे-पाटील, पूजा सुकी यांनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जीवन चरित्राची माहिती दिली. यावेळी प्रा. श्रीमती उर्मिला इंदूलकर यांनी मनोगत व्यक्त केले.अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील म्हणाले, आज संपूर्ण शिक्षण प्रक्रियाच प्रचंड वेगाने बदलत आहे. शिक्षकांने नव्या तंत्र ज्ञानाचा आपल्या अध्यापनात वापर करुन विद्यार्थ्याला नव्या युगाची आव्हाने पेलण्यासाठी समर्थ बनविणे गरजेचे आहे. त्यासाठी शिक्षकाने आपली संशोधनात्मकता वाढविली पाहिजे. संयोजन विद्यार्थीनी मंडळाची सचिव सोनिया पाटीलने केले तर सूत्रसंचालन सोनल मोरे केले. प्रा. ए. एम. साळोखे यांचे सहकार्य लाभले.